ePaper
डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला पुन्हा मोठा इशारा !

वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 14 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

पुण्यात 42.98% पाणीमीटर नादुरुस्त

## सिलिंडर तुटवड्यावरून केंद्र सरकारकडून नागरिकांना महत्त्वाचं आवाहन!

# LPG सिलेंडर चिंतेचा विषय!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम आशियातील युद्ध आणि इराणने होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर रोखल्याने जागतिक ऊर्जा पुरवठा खंडित झाला आहे. यामुळे एलपीजी पुरवठ्याबाबत भीती निर्माण झाली आहे. याबाबत निराकरण करण्यासाठी सरकारने शुक्रवारी सलग तिसऱ्या दिवशी संयुक्त आंतर मंत्रालयीन बैठकीचे आयोजन केले होते. सरकारने एलपीजी वितरकांच्या बाहेर रांगेत उभे राहण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले आहे.**



एलपीजी हा आमच्यासाठी चिंतेचा विषय आहे. आमची बहुतेक आयात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. सामुद्रधुनी बंद होणे ही चिंतेची बाब आहे. परंतु, २५ हजार वितरकांपैकी कोणत्याही वितरकाने ड्रायआऊट झाल्याची नोंद केलेली नाही. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नका. घाबरून जाऊ नका, असं आवाहनही पेट्रोलिअम मंत्रालयाने केले आहे.

सुजाता शर्मा म्हणाल्या, “कच्च्या तेलाच्या बाबतीत आपल्याकडे २५८ मेट्रिक टन शुद्धकरण क्षमता आहे. पेट्रोल आणि डिझेल उत्पादनात आपण स्वंयपूर्ण आहोत. परिणामी भारतात हे इंधन आयात करण्याची आवश्यकता नाही. आमचे सर्व शुद्धीकरण कारखाने सध्या १०० टक्के किंवा त्याहून अधिक क्षमतेने कार्यरत आहेत. शुद्धीकरण कारखाने कच्च्या तेलाचा पुरेसा साठा ठेवतात आणि शिवाय पुरवठा सातत्याने राखला जात आहे. घरगुती ग्राहकांना पीएनजी आणि सीएनजीचा पुरवठा कोणत्याही व्यत्ययाशिवाय किंवा कपातीशिवाय सुनिश्चित केला जात आहे. या परिस्थितीमुळे घाबरून जाण्याची अजिबात गरज नाही.” “शिवाय आपल्या प्रमुख शहरी शहरे आणि केंद्रांमधील व्यावसायिक ग्राहकांबद्दल बरेचजण सध्या एलीपीजी पुरवठ्यावर अवलंबून असल्यामुळे अडचणींना तोंड देत आहेत. भारत सरकार त्यांच्या चिंता दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आम्ही अशा सर्व व्यावसायिक ग्राहकांना पीएनजी कनेक्शन मिळवण्यासाठी त्यांच्या स्थानिक शहर गॅस वितरण नेटवर्क एजन्सीशी किंवा त्यांच्या नियुक्त डिलरशी संपर्क साधण्याचे आवाहन करतो”, असं पेट्रोलिअम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा म्हणाल्या.

## नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन

केंद्र सरकारच्या पेट्रोलिय मंत्रालयाकडून आज ४ वाजता पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितलं की आम्ही लोकांमध्ये गॅस तुटवडा निर्माण झाल्याची भावना निर्माण झाल्यामुळं या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि गोंधळ टाळण्यासाठी देशातील अनेक राज्यात कंट्रोल स्थापन केल्या आहेत. तरी नागरिकांनी घाबरून जावू नये असे आवाहन सरकारने केले आहे.

## इंधन पुरेशा प्रमाणात उपलब्ध

“सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. एलपीजीबाबत मी हे सांगू इच्छिते की आमच्यासाठी चिंतेची बाब आहे. तरीही या परिस्थितीत असूनही आमच्या २५ हजार वितरकांपैकी कोणत्याही वितरकामध्ये ड्रायआऊटची नोंद झालेली नाही. मी सर्व नागरिकांना आवाहन करू इच्छिते की अफवांवर विश्वास ठेवू नका. सुमारे १ लाख किरकोळ दुकानांवर इंधनांचा कोणताही साठा नसल्याचे वृत्त आहे. सर्व पेट्रोल पंपांवर पुरेसा साठा उपलब्ध आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

## रांगेत उभ्या असलेल्या व्यक्तीला हृदय विकाराचा झटका

त्यातच आज या एलपीजी शॉर्टेजचा पहिला बळी गेला आहे. पंजाबमधील बर्नाला जिल्ह्यातील सेहना गावात एलपीजी गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या एका व्यक्तीचा हृदय विकाराच्या झटक्यानं मृत्यू झाला. मृत झालेल्या व्यक्तीचे नाव भूषण कुमार असं असून या हा व्यक्ती एलपीजी सिलिंडर मिळवण्यासाठी पहाटे ५ वाजल्यापासून रांगेत उभा असल्याची माहिती मिळत आहे. प्रत्यक्षदर्शींच्या सांगण्यानुसार कुमार हे जवळपास सकाळी ७.५० वाजता रांगेत उभे असताना खाली कोसळले.

## घरगुती एलपीजी उत्पादन ३० टक्क्यांनी वाढले

तसंच, घरगुती आणि व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या पुरवठ्यात घट झाल्याची चिंतेचे निराकरण करताना केंद्र सरकारने घरगुती अखंड पुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे. ५ मार्चच्या तुलनेत घरगुती एलपीजी उत्पादन ३० टक्क्यांनी वाढले आहे.

# पुण्यात 42.98% पाणीमीटर नादुरुस्त

## महापालिकेच्या पाणीपट्टीवसुलीत मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा घट

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या पाणीपट्टीवसुलीत मागील दोन आर्थिक वर्षांच्या तुलनेत यंदा घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. 42.98 टक्के पाणीमीटर बंद किंवा नादुरुस्त असल्याने पाणी वापराची अचूक नोंद होत नसून, त्याचा थेट परिणाम वसुलीवर होत आहे. यामुळे महापालिकेच्या अपेक्षित उत्पन्नावर परिणाम झाला असून, थकबाकी देखील वाढली असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**



> समान पाणीपुरवठा योजनेनुसार पाणीमीटर बसविले जात आहेत. संपूर्ण शहरात पाणीमीटर बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपट्टी थकबाकी 891 कोटींवरून जवळपास 300 कोटींपर्यंत कमी झालेली दिसून येईल.
>
> **नंदकिशोर जगताप, प्रमुख, पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका**

शहरात पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विविध कामे सुरू आहेत. महापालिकेच्या हद्दीसह छावणी परिसराला देखील पाणीपुरवठा करताना पाणीपुरवठा विभागाला मोठी कसरत करावी लागत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची मागणीसुद्धा वाढली आहे. त्यात पाणीगळतीमुळे पाण्याचा अपव्यय वाढला आहे. ही गळती रोखण्यासाठी पाणी मीटर बसवले जात आहे. मात्र, शहरासह हद्दीच्या बाहेरील 42.98 टक्के मीटर नादुरुस्त आहेत. यामुळे पाण्याचा अचूक वापर होतो की नाही याबाबत माहिती मिळत नसल्याने त्याचा परिणाम पाणीपट्टीवसुलीवर झाला आहे. त्यामुळे नादुरुस्त मीटर बदलून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

खडकी आणि लष्कर या छावणी भागातील नागरिकांचे पाणीमीटर बदलण्याचे मोठे आव्हान मनपासमोर आहे. सध्या वापरात असलेले अनेक मीटर मेकॅनिकल तंत्रज्ञानावर आधारित असल्याने ते वारंवार नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे सरासरी वापर गृहित धरून आकारल्या जाणाऱ्या बिलांमुळे थकबाकीचा फुगवटा 899 कोटींपर्यंत पोहोचल्याचे दिसून येत आहे.

ही समस्या कमी करण्यासाठी समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शहरात मोठ्या प्रमाणावर पाणीमीटर बसविण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत सुमारे 1 लाख 95 हजार मीटर बसवले असून, एकूण 3.45 लाख मीटर बसविण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच सुमारे 1100 किलोमीटर जलवाहिन्या विकसित केल्या असून, 80 साठवण टाक्या उभारण्याचे आणि सुमारे 1600 किलोमीटर जलवाहिन्या टाकण्याचे कामही प्रस्तावित आहे. 2025-26 मध्ये टेलिस्कोपिक पद्धतीने पाणीपट्टी दर निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे कमी पाणी वापरणाऱ्यांना कमी दराने आणि जास्त पाणी वापरणाऱ्यांना अधिक दराने बिल आकारले जाणार आहे. भविष्यात अल्ट्रासॉनिक किंवा इलेक्ट्रो मॅग्नेटिक तंत्रज्ञानावर आधारित आधुनिक पाणीमीटर बसविण्याचीही योजना असून, त्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थापन अधिक अचूक आणि पारदर्शक होईल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.

### शहरात अनधिकृत नळजोडांवर कारवाईचा बडगा

सन 2026-27 या आर्थिक वर्षात शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली जाणार असून, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. या सोबतच लोकअदालतींचे आयोजन करून थकबाकीदारांकडून पाणीपट्टी वसुली करण्यावर महापालिका भर देणार आहे. या माध्यमातून पाणीपुरवठा व्यवस्थेतील अनियमितता कमी करण्याबरोबरच महसूल वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी नियमित पाणीपट्टी भरून महापालिकेच्या या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांची नशा आता पोलीस उतरवणार

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे वाहतूक पोलिसांनी जानेवारीपासून आतापर्यंत दोन हजारांपेक्षा अधिक मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करून त्यांचे समुपदेशन केले आहे. मात्र, त्यानंतरही काही चालक पुन्हा मद्यपान करून वाहन चालवताना आढळत आहेत. पोलिसांनी आता अशा चालकांविरुद्ध कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती करणाऱ्यांचा वाहन परवाना रद्द करून कारागृहात टाकण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.**



> मद्य पिऊन वाहन चालवल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होतात. यामुळे ही मोहीम तीव्र करुन प्रादेशिक परिवहन कार्यालयालाही सहभागी करुन घ्यावे. तसेच, महामार्गावरही अशीच मोहीम राबवली जावी. मद्यपान करुन वाहन चालवल्याने अपघात होण्याचे प्रमाण मोठे आहे. यामुळे केवळ चालकाच्याच नव्हे तर इतर निष्पाप नागरिकांच्या जीवितालाही मोठा धोका निर्माण होतो. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करत मद्यपानानंतर वाहन चालविण्यावर कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे.
>
> **– राजू घाटोळे, अध्यक्ष, मोटार ड्रायव्हिंग स्कूल ओनर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य**

पुण्यात मागील वर्षी ६ हजार ७०० मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली, त्यापैकी ६७ जण दुसऱ्यांदा मद्यपान करून वाहन चालवताना आढळले, त्यांचा वाहन परवाना रद्द करण्यात आला. काहींना न्यायालयाने कारागृहात पाठवले होते. यावर्षी झालेल्या कारवायांमध्येही १४ जण दुसऱ्यांदा मद्यपान करून वाहन चालवताना सापडले असून त्यांच्या विरोधातही कडक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

पुणे शहर वाहतूक विभागाने ६ ते ८ मार्च दरम्यान शहरातील विविध भागांमध्ये विशेष मोहीम राबवली. या काळात शहरात ३० ठिकाणी नाकाबंदी करून ब्रेथ ॲनालायझरच्या साहाय्याने वाहन चालकांची तपासणी करण्यात आली.

त्यात १८९ चालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत पकडलेल्या चालकांचे ११ मार्चला येरवडा येथील वाहतूक शाखेच्या पोलीस उपायुक्त कार्यालयात समुपदेशन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला १३५ मद्यपी वाहनचालक उपस्थित होते. त्यावेळी मद्यपानानंतर वाहन चालविण्याचे गंभीर परिणाम आणि नियमांचे पालन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले होते.

वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित वाहन चालवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

> मद्यपान करून दुसऱ्यांदा वाहन चालवताना सापडलेल्या व्यक्तीचा परवाना रद्द करण्यात येणार आहे. तसेच, त्याला न्यायालयात हजर करून कारागृहात रवानगी करण्याची प्रक्रियाही राबवली जाईल. यासोबतच संबंधित व्यक्तीवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी कठोर नियम लागू केले जाणार आहेत. वाहतूक सुरक्षेला बाधा आणणाऱ्या अशा कृत्यांविरोधात कठोरतली कठोर कारवाई केली जाईल.
>
> **– मनोज पाटील, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग.**

# पिंपरी-चिंचवड शहरामध्ये पाणी टंचाई!

## वाढत्या लोकसंख्येसाठी मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून भविष्यातील वाढती पाण्याची गरज भागविण्यासाठी नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. भविष्यात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. महापालिकेने मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी शहरासाठी आरक्षित करण्याची मागणी केली आहे. परंतु, विहित नमुन्यातील पाणी आरक्षण मंजुरीसाठीचा प्रस्ताव महापालिकेने पाठविले नसल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.**



### गेल्या सहा वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा

सर्वांना मुबलक व पुरेसे पाणी मिळण्यासाठी महापालिकेने नोव्हेंबर २०१९ मध्ये काही दिवसांसाठी एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला होता. काही दिवसांसाठीचा एक दिवसाआडचा पाणीपुरवठा पुढे कायम ठेवण्यात आला आहे. सहा वर्षे होत आले, तरी एक दिवसाआडच पाणीपुरवठा होत आहे. धरणात मुबलक पाणी असतानाही नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. शहरातील विविध भागातून विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारी येत आहेत. वाढीव पाणी मिळत नाही, तोपर्यंत दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे प्रशासन सांगत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील पाणी समस्येबाबत भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी तारांकित प्रश्न विचारला होता. शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून भविष्यातील वाढती पाण्याची गरज भागविण्यासाठी नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याबाबत केले जात आहे, सद्य:स्थितीत शहराला पवना, आंद्रा आणि भामा-आसखेड धरणातून पाणी पुरवठा केला जात असला, तरी भविष्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

महापलिका प्रशासनाने मुळशी धरणातून पिंपरी-चिंचवड शहरासाठी पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे का, शहरासाठी मुळशी आणि चासकमान धरणातून पाणी आरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, असे विविध प्रश्न आमदार महेश लांडगे यांनी विचारले होते. त्याला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी लेखी उत्तर दिले आहे. शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून भविष्यातील वाढती पाण्याची गरज भागविण्यासाठी नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. भविष्यात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची २०३१ मध्ये ५२.७४ लाख लोकसंख्या होईल हे गृहित धरुन पवना धरणातून ६.६५ टीएमसी, भामा आसखेड धरणातून २.१५ टीएमसी आणि आंद्रा धरणातून १.३० टीएमसी पाणी आरक्षण मंजूर केले आहे. महापालिकेने ६ डिसेंबर २०२३ रोजी मुळशी धरणातून अतिरिक्त ९.८१ टीएमसी (७६० दशलक्ष लीटर-एमएलडी) पाण्याची मागणी केली आहे. परंतु, विहित नमुन्यातील पाणी आरक्षण मंजुरीसाठीचा प्रस्ताव महापालिकेकडून अद्याप प्राप्त झाला नाही. पिंपरी-चिंचवड महापालिकेला चासकमान धरणातून पाणी आरक्षण मंजूर नसल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी लेखी उत्तरात सांगितले आहे.

# मोशी–चिखली परिसरात 11 ठिकाणी "नो पार्किंग झोन"

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी–चिखली परिसरातील वाढती वाहतूक कोंडी आणि अपघातांची मालिका रोखण्यासाठी भाजपा नगरसेवक नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या पुढाकारामुळे पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने परिसरातील ११ प्रमुख सिग्नल चौकांपासून १०० मीटरपर्यंतचा परिसर 'नो-पार्किंग झोन' म्हणून घोषित केला आहे. तसेच ३१ मीटर रस्त्यावरही वाहन पार्किंगला बंदी घालण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.**



"मोशी–चिखली परिसरातील वाहतूक कोंडी ही नागरिकांसाठी मोठी समस्या बनली होती. वारंवार होणारे अपघात आणि कोंडीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे हा प्रश्न तातडीने सोडवणे गरजेचे होते. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत मी वाहतूक विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि त्यातूनच या ११ महत्त्वाच्या चौकांमध्ये 'नो-पार्किंग'चा निर्णय झाला आहे. हा निर्णय केवळ सुरुवात आहे. पुढेही परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुटसुटीत आणि सुरक्षित करण्यासाठी प्रशासनासोबत समन्वय साधून आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविणार आहे. नागरिकांना सुरक्षित, सुरळीत आणि जलद प्रवास मिळावा, हीच आमची प्राथमिकता आहे.

– निखिल बोऱ्हाडे, नगरसेवक, भाजपा, मोशी बोऱ्हाडेवाडी.

### नागरिकांना दिलेला शब्द पाळला

केवळ समस्या मांडण्यापेक्षा त्यावर ठोस उपाययोजना करून प्रशासनाकडून अधिकृत आदेश काढून घेण्याची कार्यपद्धती ही बोऱ्हाडे यांच्या कामाची वैशिष्ट्ये मानली जात आहेत. त्यांच्या या पुढाकारामुळे मोशी–चिखली परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. निखिल बोऱ्हाडे यांच्या या प्रयत्नांचे शहरभर कौतुक होत असून, नागरिकांना दिलेला शब्द पाळत त्यांनी जनसेवेचा आदर्श निर्माण केल्याची भावना परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### या चौकांमध्ये 'नो-पार्किंग'ची अंमलबजावणी

वाहतूक व्यवस्थापनासाठी लक्ष्मी चौक, कोर्ट चौक, जय भारत चौक, श्रीराम चौक, जाधव सरकार चौक, गोल्ड जिम चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मोशी चौक, भारतमाता चौक, क्रांती चौक आणि बोऱ्हाडेवाडी चौक या महत्त्वाच्या चौकांपासून १०० मीटरपर्यंत वाहन उभे करण्यास बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे रस्त्यांवरील अडथळे कमी होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत होणार आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी या मुद्यावर पाठपुरावा केला. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे होणारे हाल आणि वारंवार घडणारे अपघात लक्षात घेऊन बोऱ्हाडे यांनी २५ फेब्रुवारी रोजी पोलीस उपायुक्तांकडे ठोस उपाययोजनांची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत प्रशासनाने अवघ्या १५ दिवसांत अधिकृत अधिसूचना काढत या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

परिसरातील नागरिकांकडून वाढत्या वाहतूक समस्येबाबत वारंवार तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे वाहतूक विभागाने तातडीने पावले उचलत 'नो-पार्किंग'चा निर्णय घेतला आहे.



## भूमिका

**आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या परिणामांचा फटका आता थेट सर्वसामान्यांच्या जीवनावर बसू लागला आहे. अमेरिका व इस्त्रायलने इराणवर सुरू ठेवलेल्या हल्ल्यांमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर परिणाम झाला असून त्याचे पडसाद भारतातही उमटताना दिसत आहेत.**

# युद्धाच्या झळा स्वयंपाकघरापर्यंत



विशेषतः कर्नाटक राज्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा गंभीर स्वरूप धारण करत आहे. घरगुती सिलिंडरचा पुरवठा काही प्रमाणात सुरळीत असला तरी हॉटेल, देवस्थान, वसतीगृह, लग्नसमारंभ आणि इतर व्यावसायिक ठिकाणी वापरल्या जाणाऱ्या सिलिंडरची कमतरता मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे.

या टंचाईचा परिणाम अनेक क्षेत्रांवर दिसून येत आहे. कर्नाटकातील अनेक देवस्थानांमध्ये प्रसाद तयार करण्यासाठी लागणारा गॅस उपलब्ध नसल्याने प्रसाद वितरणात अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्याचप्रमाणे हॉटेल उद्योगालाही मोठा फटका बसला आहे. काही हॉटेल्सना मेनूकार्ड बदलावे लागले असून गॅसची उपलब्धता लक्षात घेऊन मर्यादित पदार्थच ग्राहकांना दिले जात आहेत. अनेक ठिकाणी गॅसअभावी हॉटेल बंद करण्याची वेळ आली आहे. बेंगळूरसारख्या मोठ्या शहरातही परिस्थिती चिंताजनक बनली आहे.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने लग्नसमारंभात मोठ्या प्रमाणावर अन्न शिजवण्यासाठी व्यावसायिक सिलिंडरची आवश्यकता असते. मात्र पुरवठा कमी झाल्यामुळे लग्नसमारंभांच्या आयोजनात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी पारंपरिक चुलीवर स्वयंपाक करण्याचा पर्याय स्वीकारावा लागत आहे. तसेच अनेक पीजी आणि विद्यार्थी वसतीगृहांमध्येही गॅसअभावी मेनूमध्ये बदल करण्यात आले आहेत.

परिस्थितीचा फायदा घेत काही ठिकाणी काळाबाजारालाही सुरुवात झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. कृत्रिम टंचाई निर्माण करून अधिक दराने सिलिंडर विकण्याचा प्रयत्न होत असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे प्रशासनासाठी ही परिस्थिती हाताळणे अधिक आव्हानात्मक ठरत आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन कर्नाटक सरकार सक्रिय झाले आहे. अन्न व नागरीपुरवठा खात्याचे मंत्री के. एच. मुनियप्पा यांनी तेल कंपन्या व सिलिंडर वितरकांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन आवश्यक सूचना दिल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत घरगुती सिलिंडरच्या वितरणावर परिणाम होऊ नये, याची विशेष काळजी घ्यावी तसेच व्यावसायिक सिलिंडरचे वितरण करताना शाळा, कॉलेज, रुग्णालये यांना प्राधान्य द्यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. गॅस वितरण व्यवस्थेवर पोलीस आणि नागरीपुरवठा विभागानेही विशेष लक्ष ठेवले आहे.

दरम्यान, या प्रश्नावरून राज्यातील राजकारणही तापले आहे. कर्नाटक सरकारने केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली आहे. युद्धामुळे पेट्रोलियम आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगत राज्य सरकारने केंद्राला जबाबदार धरले आहे. कर्नाटक विधानसभेतही या मुद्द्यावरून चर्चा झाली. काँग्रेस नेते प्रियांक खर्गे यांनी केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणावर प्रश्न उपस्थित केले. त्याउलट अन्न व नागरीपुरवठा मंत्री मुनियप्पा यांनी युद्धामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगत सर्वांनी संयम राखण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही या मुद्द्यावर केंद्र सरकारकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांना पत्र पाठवून एलपीजी उत्पादन वाढवण्याची आणि घरगुती सिलिंडरच्या पुरवठ्याला प्राधान्य देण्याची मागणी त्यांनी केली आहे. मात्र या धोरणामुळे काही शहरांमध्ये व्यावसायिक सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

## प्रासंगिक »

### मित्र

***विनोद आणि अजय यांची खूप चांगली मैत्री होती. ते एकाच वर्गात शिकत होते. विनोद मन लावून शिकायचा पण अजयचे मन मात्र सदैव इकडे तिकडे नेहमीच भरकटलेले असायचे.***

वर्गात शिक्षक शिकवत असताना अजयला वारंवार बोलणी खावी लागायची, तर विनोद नेहमी शाबासकी मिळवायचा. एकदा विज्ञानाच्या तासाला शिक्षकांनी गृहपाठ एका बाजूने लिहायला सांगितले होते. सर्वांनी तसे केले, पण अजयने दोन्ही बाजूंनी लिहिले. शिक्षक रागावले आणि वही पुन्हा लिहायला सांगितली. अजय घाबरला. ते पाहून विनोदने शिक्षकांची परवानगी घेऊन नवीन वही आणली आणि अजयसोबत बसून गृहपाठ पूर्ण करून दिला. मित्राच्या मदतीमुळे अजयला आपली चूक कळली. त्या दिवसापासून त्याने लक्षपूर्वक अभ्यास करण्याची सवय लावली.

तात्पर्य- लक्षपूर्वक काम करणे आणि विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करणे या दोन गोष्टी पाळल्यास अनेक संकटावर मात करता येते. तसेच होणारे नुकसान टाळता येते.

गेली १२ वर्षे कोमामध्ये असलेल्या हरीश राणा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने 'निष्क्रिय इच्छामरणा'ला कायदेशीर मान्यता देत या विषयावर देशात नवी दिशा दाखवली आहे.

# इच्छामरणाची चर्चा पुन्हा केंद्रस्थानी



दीर्घकाळ असाध्य आजाराने ग्रस्त असलेल्या किंवा उपचारांनी बरे होण्याची कोणतीही शक्यता नसलेल्या रुग्णांच्या संदर्भात 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' या संकल्पनेची पुन्हा एकदा न्यायालयीन पातळीवर पुष्टी झाली आहे. हरीश राणा हा अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर गेली अनेक वर्षे कोमामध्ये होता. त्याच्या उपचारांवर मोठ्या प्रमाणावर खर्च होत होता आणि त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक व मानसिक ताण सहन करावा लागत होता.

डॉक्टरांनीही त्याच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता नसल्याचे स्पष्ट केले होते. या परिस्थितीत कुटुंबीयांनी न्यायालयात उपचार थांबवण्याची परवानगी मागितली. वैद्यकीय मंडळाच्या अहवालाचा विचार करून न्यायालयाने उपचार थांबवण्यास मान्यता दिली. हा निर्णय देताना न्यायमूर्तींनाही भावनिक क्षणांचा सामना करावा लागला, यावरून या विषयाची संवेदनशीलता स्पष्ट होते. भारतामध्ये 'सक्रिय इच्छामरण' म्हणजे औषध देऊन मृत्यू घडवून आणण्यास अद्याप कायदेशीर परवानगी नाही. मात्र 'निष्क्रिय इच्छामरण' म्हणजे कृत्रिमरीत्या जीवन वाढवणारे उपचार थांबवण्यास काही अटींसह मान्यता देण्यात आली आहे. २०१८ मध्ये 'कॉमन कॉज' प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 'सन्मानाने मरण्याचा अधिकार' हा संविधानातील कलम २१ अंतर्गत दिलेल्या सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचा भाग असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर 'लिव्हिंग विल' म्हणजे मृत्यूसंदर्भातील इच्छापत्र करण्याची संकल्पनाही पुढे आली. इच्छामरणाचा विषय केवळ वैद्यकीय किंवा कायदेशीर नसून तो नैतिक, धार्मिक आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही गुंतागुंतीचा आहे. अनेक धर्मांमध्ये मानवी जीवन पवित्र मानले जाते आणि कोणत्याही परिस्थितीत जीवन संपवण्यास विरोध केला जातो. दुसरीकडे, असह्य वेदनांनी ग्रस्त रुग्णांना सन्मानाने मृत्यू स्वीकारण्याचा पर्याय असावा, असा मतप्रवाहही समाजात आहे. त्यामुळे या विषयावर संतुलित विचार करण्याची आवश्यकता आहे.

जगातील काही देशांमध्ये सक्रिय इच्छामरणालाही कायदेशीर मान्यता आहे; मात्र त्याचा गैरवापर होऊ नये यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. भारतातही भविष्यात या विषयावर व्यापक कायदा करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला याबाबत कायदा करण्याची सूचना केली आहे. संभाव्य कायद्यात रुग्ण, कुटुंबीय आणि वैद्यकीय तज्ज्ञ यांच्या अधिकारांचे संरक्षण करताना गैरवापर रोखण्यासाठी ठोस तरतुदी असणे अत्यावश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



ओले मूळ भेदी खडकाचें अंग ।
अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे असे काही नाही अवघड ।
नाही कैवाड तोचवरी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आयएएस उत्तीर्ण ओबीसी उमेदवारांना दिलासा

## आरक्षणातील क्रिमिलेअर व नॉन-क्रिमिलेअरचा मुद्दा पुन्हा चर्चेत

**महाईन्यूज** । नागपूर

**सर्वोच्च न्यायालयाच्या अलिकडच्या निर्णयाचा भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) परीक्षा उत्तीर्ण इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. सोबतच आरक्षणातील क्रिमिलेअर व नॉन-क्रिमिलेअरचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीत क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची मागणी विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांकडून जोर धरत आहे.**




ओबीसी आरक्षणाचा मूळ उद्देश सामाजिकदृष्ट्या मागास घटकांना शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये संधी उपलब्ध करून देणे हा आहे. ओबीसी समाजातही काही कुटुंबे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या प्रगत झाल्यामुळे त्यांना आरक्षणाच्या लाभातून वगळण्याची संकल्पना पुढे आली. यालाच 'क्रिमिलेअर' म्हणतात. तुलनेने कमी उत्पन्न असलेली कुटुंबे 'नॉन-क्रिमिलेअर' म्हणून ओळखली जातात आणि त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळतो.

क्रिमिलेअर आणि नॉन-क्रिमिलेअरची संकल्पना प्रथम इंद्रा साहनी विरुद्ध भारत सरकार या सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालातून पुढे आली. या निकालात न्यायालयाने ओबीसींना २७ टक्के आरक्षण वैध ठरवले; मात्र ओबीसी समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या प्रगत घटकांना आरक्षणाचा लाभ देता येणार नाही, असे स्पष्ट केले. त्यामुळे सरकारला ओबीसींमध्ये क्रिमिलेअर आणि नॉन-क्रिमिलेअर अशी विभागणी करणे आवश्यक ठरले.

केंद्र सरकारच्या सध्याच्या निकषांनुसार क्रिमिलेअर ठरवण्यासाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आठ लाख रुपये आहे. कुटुंबाचे उत्पन्न या मर्यादेपेक्षा जास्त असल्यास ते क्रिमिलेअरमध्ये गणले जाते आणि अशा कुटुंबांना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळत नाही. आठ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्यांना नॉन-क्रिमिलेअर मानले जाते आणि त्यांना शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाचा लाभ मिळतो.

गेल्या काही वर्षांत महागाई, शिक्षणाचा खर्च आणि जीवनमान महाग झाल्यामुळे आठ लाख रुपयांची मर्यादा कमी असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. अनेक ओबीसी कुटुंबांचे उत्पन्न थोडेसे जास्त असल्यामुळे ते क्रिमिलेअरमध्ये जातात आणि त्यामुळे त्यांना आरक्षणाचा लाभ मिळत नाही. या पार्श्वभूमीवर क्रिमिलेअरची मर्यादा १०-१२ लाख रुपयांपर्यंत वाढवावी अशी मागणी जोर धरत आहे.


### न्यायालयाचा निकाल काय?

अलिकडे सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. एखादा उमेदवार क्रिमिलेअरमध्ये येतो की नॉन-क्रिमिलेअरमध्ये, हे फक्त कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नावरून ठरवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. क्रिमिलेअर ठरवताना फक्त पालकांचे वेतन किंवा उत्पन्न विचारात घेता येणार नाही; पालकांचे पद, सेवास्थिती, सामाजिक दर्जा आणि इतर घटकांचा देखील विचार करणे आवश्यक आहे. यासाठी १९९३ मध्ये निश्चित केलेल्या मूळ मार्गदर्शक तत्त्वांचा आधार घ्यावा, असेही न्यायालयाने सांगितले. त्यामुळे आयएएस परीक्षा उत्तीर्ण शेकडो उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. ११ मार्च २०२६ रोजी दिलेल्या या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणातील क्रिमिलेअर ठरवण्याच्या प्रक्रियेवर पुन्हा लक्ष केंद्रित झाले असून, क्रिमिलेअरची मर्यादा, निकष आणि नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र देण्याच्या पद्धतीवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

# एलपीजी गॅस पाठोपाठ सल्फ्युरिक ॲसिडच्या तुटवड्याची शक्यता

**महाईन्यूज** । छत्रपती संभाजीनगर

**एलपीजी प्रमाणे पुढील काळात सल्फ्युरिक ॲसिडचाही तुटवडा जाणवेल. यामुळे साखर कारखान्यांच्या उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. पेट्रोलियम पदार्थातील गंधक बाजूला करुन त्याचा साखर बनिविण्यासाठी उपयोग केला जातो. येत्या १५ – २० दिवसात याचा साठा कमी होईल असे चेंबर ऑफ ऑरिक इंडस्ट्रीयल असोसिएशनचे संदीप देशमुख यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या बैठकीमध्ये सांगितले. केवळ साखर कारखाने नाही तर कपडा आणि साबण बनविण्याऱ्या कंपन्यांना रसायने मिळण्यात मोठी अडचण होऊ शकते असे सांगण्यात येत आहे.**




साखर कारखान्यांमध्ये उसाच्या रसापासून साखर वेगळी करण्यासाठी रसातील पाण्याचे प्रमाण कमी करताना सल्फ्युरिक ॲसिडचा वापर करावा लागतो. गेल्या वर्षभरात या ॲसिडचा एक लाख ५ हजार टन वापर झाला होता. वेसर्न्स शुगर मिल असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे म्हणाले, ' गेल्या काही महिन्यापासून सल्फ्युरिक ॲसिडची कमतरता जाणवतच होती.

गेल्या वर्षी १५ हजार रुपये टन असणारे ॲसिड आता ६० हजार रुपयांपर्यंत वाढले आहे. साखर कारखान्याच्या प्रक्रियेत गंधक लागते. हे तेल शुद्धीकरणाच्या प्रक्रियेतून मिळते. या क्षेत्रात महाराष्ट्रात एकमेव पुरवठादार एजन्सी म्हणून रिलायन्स हे एकमेव नाव होते.तेल शुद्धीकरण करणाऱ्या कंपन्यांकडून ॲसिडचा पुरवठा होतो. साधारणत: मध्यम क्षमता असणाऱ्या साखर कारखान्यांना २५० टन एवढे ॲसिड लागते. ' युद्धजन्य स्थितीमध्ये हा पुरवठा विस्कळीत होऊ शकतो अशी भीती व्यक्त होत आहे.

या क्षेत्राची माहिती असणारे उद्योजक संदीप देशमुख म्हणाले, ' कच्च्या तेलाची गुणवत्ता हलके किंवा जड आणि गोड किंवा तुरट अशा प्रकारे मोजले जाते. मध्य पूर्व भागातून येणाऱ्या तेलामध्ये गंधकाचे प्रमाण १.५ ते २.५ टक्के असते. व्हेन्यूझुएलामधून येणाऱ्या कच्च्या तेलात गंधकाचे प्रमाण अनुक्रमे ३ ते ५.५ एवढे असते. तर रशियाकडून येणाऱ्या तेलात हे प्रमाण तुलनेने कमी असते. गंधक हा साखरेसाठी मुख्य घटक असतो. त्याचे दर आणि उपलब्धता यात समस्या येऊ शकतात. त्याकडे सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.'

गेल्या काही आठवड्यात ॲसिडच्या किंमतीमध्ये ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. गंधक केवळ निर्यातीवर अवलंबून नाही. मात्र, युद्धस्थितीमध्ये या कडे लक्ष दिले नाही तर परिणाम गंभीर होऊ शकतात. ' केवळ साखरच नाही तर खते, धातूवरील प्रक्रिया उद्योग, तेल शुद्धीकरण कारखाने, रंग आदीमध्ये वापरली जाते. त्यामुळे आता सल्फ्युरिक ॲसिडचा तुटवडा होऊ शकतो. ' यातून मार्ग काढण्यासाठी विविध कंपन्यांबरोबर सरकारने समन्वय ठेवून काम करावे, असा सल्लाही उद्योग मंत्र्यांना बैठकीत देण्यात आला.

# डोनाल्ड ट्रम्पचा इराणला इशारा!

## पुढील आठवड्यात आणखी मोठ्या हल्ल्याची तयारी; डोनाल्ड ट्रम्प

**महाईन्यूज । अमेरिका**

**मेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्ध अद्यापही सुरूच आहे. अमेरिका-इस्रायल संयुक्तपणे इराणवर हल्ले करत आहेत, तर इराणही प्रतिहल्ले करत असल्यामुळे मध्य पूर्वेत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या युद्धाचा अनेक देशांना मोठ्या प्रमाणात फटका बसत असून जगातील अनेक देशांना होणारा तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत झाला आहे.**



होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्यामुळे तेलाच्या जहाजांच्या वाहतुकीला अडथळे येत असल्याने कच्च्या तेलाचा व्यापार ठप्प होण्याची शक्यता आहे. व्यापारी जहाजांवर हल्ले होत असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती आहे. असं असतानाच आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा मोठं वक्तव्य करत इराणला इशारा दिला आहे. पुढील आठवड्यात इराणवर आणखी जोरदार हल्ला करण्याची योजना असल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्धाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी आज पुन्हा एकदा मोठा इशारा दिला. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, गरज पडल्यास अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजे सुरक्षितपणे बाहेर काढेल. तसेच अमेरिकेच्या नेतृत्वाखालील हे युद्ध यशस्वी होईल. तसेच पुढील आठवड्यात इराणवर आणखी मोठा हल्ला करण्याची योजना आहे, असं भाष्य डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी फॉक्स न्यूजच्या मुलाखतीत बोलताना केलं.

डोनाल्ड ट्रम्प यांची ११ मार्च रोजी जी ७ नेत्यांबरोबर व्हर्च्युअल बैठक झाली. या बैठकीत त्यांनी इराण युद्धाबाबत मोठा दावा केला. इराण शरणागती पत्करण्याच्या तयारीत आहे, असं त्यांनी म्हटलं. AXIOS ने यासंदर्भतील वृत्त दिलं. इराण शरणागती पत्कारण्याच्या तयारीत असल्याचा दावा करताना त्यांनी असंही सुचवलं की तेहरानमध्ये असा कोणताही अधिकारी जिवंत राहिलेला नाही ज्याच्याकडे निर्णय घेण्याची शक्ती असेल. "नेता कोण आहे हे कोणालाही माहिती नाही, त्यामुळे कोणीही आत्मसमर्पणाची घोषणा करू शकत नाही", असं ट्रम्प म्हणाले आहेत.

इस्रायल मोजतबा खामेनी किंवा हिजबुल्लाचे नेते नईम कासिम यांना लक्ष्य करणार का, असे विचारले असता, नेतन्याहू यांनी ही शक्यता नाकारता येणार नाही असे उत्तर दिले. "दहशतवादी संघटनांच्या कोणत्याही नेत्याच्या आयुष्याबाबत (LIFE INSURANCE POLICY) मी कोणतीही शाश्वती किंवा हमी देणार नाही." असे नेतान्याहू म्हणाले. "आम्ही काय योजना आखत आहोत किंवा आम्ही काय करणार आहोत, याबद्दलचा नेमका रिपोर्ट येथे देण्याचा माझा कोणताही विचार नाही," असेही पुढे बोलताना नेतान्याहू म्हणाले.

### नेतान्याहू यांचा मोजतबा खामेनींना थेट इशारा!

अमेरिका-इस्रायल यांची इराणविरोधातील लष्करी कारवाई अजूनही सुरूच असून यामुळे मध्यपूर्वेत संघर्ष पेटला आहे. यादरम्यान इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी इराणचे नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांना इशारा दिला. खामेनी यांच्यासाठी कुठलाही 'लाईफ इन्शुरन्स' नाही, असे नेतान्याहू म्हणाले आहेत. अमेरिका-इस्रायल यांची इराणविरोधातील लष्करी कारवाई ही चांगल्या प्रकारे प्रगती करत आहे, असे नेतान्याहू गुरूवारी माध्यमांशी बोलताना म्हणाले.

## होर्मुझच्या सामुद्रधुनीत भारतीय ध्वज असलेले अनेक तेलवाहू टँकर अडकले

**महाईन्यूज । इराण**

**चालू असलेल्या आखाती युद्धाच्या दरम्यान, भारतीय ध्वज असलेले एक तेलवाहू जहाज (ऑइल टँकर) 'हॉर्मुझच्या सामुद्रधुनी'तून सुखरूप बाहेर पडले आहे, तर इतर २७ जहाजे अजूनही युद्धग्रस्त भागातच अडकलेली आहेत, अशी अधिकृत माहिती सरकारने शुक्रवारी दिली. सरकारने पुढे असेही सांगितले की, हे युद्ध सुरू असताना तीन भारतीय खलाशांना आपला जीव गमवावा लागला आहे आणि एक खलाशी अजूनही बेपत्ता आहे. या सर्व जहाजांवर मिळून ७०० हून अधिक खलाशी तैनात आहेत.**



अमेरिका आणि इस्रायलने इराणविरोधात पुकारलेल्या युद्धामुळे इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीवर कब्जा मिळवला आहे. त्यामुळे येथील जहाज वाहतूक पूर्णतः थांबली आहे. पर्शियन खाडीला जागतिक बाजारपेठेशी जोडणारा अरुंद मार्ग असलेल्या 'हॉर्मुझच्या सामुद्रधुनी'तील वाढत्या तणावामुळे, विविध देशांची सरकारे आणि जहाजांच्या कंपन्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नौकानयन मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश के. सिन्हा यांनी सांगितले की, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये आणि आसपास कार्यरत असलेल्या भारतीय जहाजांवर सरकार सतत लक्ष ठेवून आहे. भारतीय ध्वज असलेले एक जहाज आज हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून बाहेर पडले आहे."

या जहाजाबद्दल अधिक माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, हे जहाज सामुद्रधुनीच्या पूर्व दिशेला होते आणि त्याला हा मार्ग ओलांडण्याची गरज नव्हती. हे जहाज भारतात येत नसून आफ्रिकेच्या दिशेने जात आहे, असे त्यांनी नमूद केले. सिन्हा पुढे म्हणाले की, प्रशासन या भागातील सर्व भारतीय जहाजांवर लक्ष ठेवून आहे आणि जहाज कंपन्यांशी जवळून समन्वय साधत आहे. त्यांनी खात्री दिली की, "प्रत्येक भारतीय जहाजाचे सरकारकडून निरीक्षण केले जात आहे."

सिन्हा यांनी संपूर्ण आखाती प्रदेशात काम करणाऱ्या भारतीय खलाशांच्या मोठ्या संख्येवरही प्रकाश टाकला. ते म्हणाले, "संपूर्ण आखाती क्षेत्रात व्यापारी जहाजे आणि ऑफशोअर वेसल्ससह विविध जहाजांवर अंदाजे २३,००० भारतीय खलाशी कार्यरत आहेत. नौकानयन महासंचालनालय (DIRECTORATE GENERAL OF SHIPPING) त्यांच्या संबंधित एजन्सींच्या माध्यमातून या सर्वांशी सतत संपर्कात आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले. नौकानयन मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, जहाज कंपन्यांशी समन्वय राखण्यासाठी भारतातील सर्व बंदरांसाठी 'मानक कार्यप्रणाली' (SOP) जारी करण्यात आली आहे, तर एलपीजी (LPG) वाहून नेणाऱ्या जहाजांना बंदरांवर प्राधान्य दिले जात आहे.

### हॉर्मुझच्या आसपास अनेक जहाजे

आखाती प्रदेशातील सागरी व्यापारांवर सिन्हा म्हणाले की, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीच्या आसपासच्या भागात अजूनही भारतीय ध्वज असलेली २७ जहाजे आणि ७०० हून अधिक खलाशी तैनात आहेत. हॉर्मुझ सामुद्रधुनीच्या पश्चिमेला, पर्शियन खाडीमध्ये भारतीय ध्वज असलेली २४ जहाजे आहेत, ज्यावर एकूण ६७७ भारतीय खलाशी आहेत; ही संख्या कालच्या इतकीच आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनीच्या पूर्वेला, ओमानच्या आखातात पूर्वी चार जहाजे होती. काल त्यांपैकी एक तेलवाहू जहाज, 'जग प्रकाश' (JAG PRAKASH), त्या भागातून बाहेर पडले. परिणामी, आता त्या प्रदेशात भारतीय ध्वज असलेली तीन जहाजे शिल्लक असून त्यावर ७६ भारतीय खलाशी आहेत," असे त्यांनी नमूद केले.



## वैदेही परशुरामीचा पारंपरिक लूक सोशल मीडियावर व्हायरल

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री वैदेही परशुरामी नेहमीच तिच्या सौंदर्यामुळे आणि स्टाईलमुळे चर्चेत असते. आधुनिक लूकसोबतच पारंपरिक वेशभूषेतही ती तितकीच मोहक दिसते. नुकतेच तिने सोशल मीडियावर मरून रंगाच्या साडीत केलेले पारंपरिक फोटोशूट शेअर केले असून या फोटोंनी चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या फोटोशूटमध्ये वैदेहीने मरून रंगाची आकर्षक साडी परिधान केली आहे. साधेपणा आणि देखणेपणा यांचा सुंदर मिलाफ या लूकमध्ये दिसून येतो. साडीबरोबरच तिने घातलेले जड सोन्याचे दागिने तिच्या सौंदर्यात आणखी भर घालत आहेत. गळ्यातील मोठा सोन्याचा हार, नाकातील नाजूक नथ आणि कानातील झुमके यामुळे तिचा लूक अगदी मराठमोळा आणि राजेशाही दिसत आहे.

याशिवाय साडीला मॅचिंग बांगड्या आणि कपाळावरील छोटी टिकली तिच्या पारंपरिक रूपाला अधिक खुलवत आहेत. केसांची सुंदर स्टाईल आणि हलका मेकअप यामुळे वैदेहीचा लूक साधा पण आकर्षक वाटतो. या फोटोंमधील तिचे गोड आणि नैसर्गिक हसूही चाहत्यांना विशेष भावले आहे. सोशल मीडियावर हे फोटो शेअर होताच चाहत्यांनी त्यावर भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी तिच्या पारंपरिक लूकचे कौतुक करत "मराठमोळी सौंदर्याची झलक" असेही म्हटले आहे. काही चाहत्यांनी तर तिच्या नथीच्या नखऱ्याचे आणि साडीच्या एलिगंट स्टाईलचे विशेष कौतुक केले आहे.

फॅशनच्या बाबतीत वैदेही नेहमीच वेगळेपण जपताना दिसते. आधुनिक ड्रेस असो किंवा पारंपरिक साडी प्रत्येक लूकमध्ये ती आत्मविश्वासाने आणि सहजतेने वावरताना दिसते. त्यामुळेच अनेक तरुणींसाठी ती फॅशन आयकॉन मानली जाते.

वैदेहीच्या या पारंपरिक फोटोशूटमुळे पुन्हा एकदा मराठमोळ्या साडीचा आणि पारंपरिक दागिन्यांचा ट्रेंड चर्चेत आला आहे. साधेपणा, पारंपरिकता आणि आकर्षकता यांचा सुंदर संगम असलेला हा लूक सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

### ८ वर्षांपूर्वीचा ऑडिओ लीक..

## रश्मिका मंदानाचा संताप

दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीपासून ते बॉलिवूडपर्यंत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री रश्मिका मंदाना सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. काही दिवसांपूर्वी अभिनेता विजय देवरकोंडा याच्यासोबतच्या लग्नाच्या चर्चेमुळे ती बातम्यांमध्ये होती. मात्र आता तिच्या आठ वर्षांपूर्वीच्या एका ऑडिओ क्लिपमुळे सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला आहे. हा ऑडिओ लीक झाल्यानंतर रश्मिकाने यावर तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधितांना २४ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, हा ऑडिओ रश्मिका मंदानाची आई सुमन यांच्याशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. या ऑडिओमध्ये कन्नड भाषेत काही संवाद ऐकू येत असून त्या वेळी घडलेल्या काही वैयक्तिक घटनांचा उल्लेख असल्याचे बोलले जात आहे. हा संवाद भावनिक स्वरूपाचा असल्यामुळे सोशल मीडियावर त्याची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली. या प्रकरणावर रश्मिका मंदानाने अखेर मौन सोडले. तिने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर करत संपूर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. रश्मिकाने सांगितले की, हा ऑडिओ जवळपास आठ वर्षांपूर्वीच्या वैयक्तिक संभाषणाचा आहे.

त्या संभाषणातील एक छोटासा भाग मुद्दाम संदर्भाबाहेर काढून सोशल मीडियावर पसरवला जात आहे. त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज निर्माण होत आहेत.

रश्मिकाने स्पष्ट केले की हा ऑडिओ कोणत्याही व्यक्तीच्या परवानगीशिवाय सार्वजनिक करण्यात आला आहे. त्यामुळे हा प्रकार तिच्या आणि तिच्या कुटुंबाच्या खासगी आयुष्यावर गंभीर आघात करणारा आहे. तिने सांगितले की, अशा प्रकारे वैयक्तिक संभाषण रेकॉर्ड करून ते सार्वजनिक करणे हे अत्यंत चुकीचे आणि अनैतिक आहे.





## भारतातील सर्वात श्रीमंत चित्रपट निर्माता!

फोर्ब्स मॅगझीनने नुकतीच जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींची यंदाची यादी जाहीर केली आहे. 'फोर्ब्स २०२६' च्या या अब्जाधीशांच्या यादीत जगातील ४००० व्यक्तींचा समावेश असून त्यात भारताचे ३०० हून अधिक लोक आहेत. यामध्ये कला आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित काही सेलिब्रिटींचाही समावेश आहे. यामध्ये एका मीडिया सम्राटाने सलग चौथ्या वर्षी 'भारतातील सर्वात श्रीमंत चित्रपट निर्माता' होण्याचा मान पटकावला आहे. या अब्जाधीशाचं नाव आहे कलानिधी मारन. कलानिधी मारन हे सध्या भारतातील सर्वात श्रीमंत चित्रपट निर्माते आहेत. फोर्ब्सच्या अहवालानुसार, त्यांची संपत्ती तब्बल २.८ अब्ज डॉलर्स म्हणजेच जवळपास २६,००० कोटी रुपये इतकी आहे. त्यांच्या या संपत्तीत सर्वात मोठा वाटा 'सन पिक्चर्स' या प्रॉडक्शन हाऊसचा आहे. तमिळ चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या 'सन पिक्चर्स'ने एंथिरन, पेट्टा, बीस्ट, जेलर आणि कुली यांसारख्या सुपरहिट चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यांच्या आगामी चित्रपटांमध्ये रजनीकांत आणि अल्लू अर्जुन यांचा 'जेलर' आणि ॲटलीचा आगामी सिनेमा, अशा दोन बड्या सिनेमांचा समावेश आहे.

## शर्वरी वाघच्या नवीन चित्रपटाचा टीझर रिलीज



बॉलीवूडमध्ये येत्या काळात अनेक लोकप्रिय कलाकारांचे नवीन चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. अशातच आता या यादीत अजून एका चित्रपटाचा समावेश झाला आहे. बॉलीवूड चित्रपटांत काम करत आपल्या अभिनयाने अनेकांची मनं जिंकणाऱ्या मराठमोळ्या शर्वरी वाघच्या चित्रपटाचा यामध्ये समावेश आहे.

'मुंज्या' या मराठमोळी कथा असलेल्या हिंदी चित्रपटातून शर्वरी वाघला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली. त्यानंतर ती आमिर खानचा मुलगा जुनैद खानसह 'माहराज' या चित्रपटात झळकली. यामध्ये तिने साकारलेल्या विराज या गुजराती व्यक्तिरेखेसाठी तिचं अनेकांनी कौतुक केलेलं. गुजराती भाषेचा लहेजा, लूक सर्वच शर्वरीने उत्तमरित्या हाताळलेलं. त्यानंतर अभिनेत्री 'वेदा' या चित्रपटातून झळकली. अशातच आता इम्तियाज अली दिग्दर्शित मैं वापस आउंगा' या चित्रपटातून ती झळकणार आहे.

शर्वरी वाघसह इम्तियाज अली यांच्या या चित्रपटात पंजाबी अभिनेता आणि गायक दिलजीत दोसांझ व बॉलीवूड अभिनेता वेदांग रैना महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहेत. शर्वरी यामध्ये मुख्य नायिकेच्या भूमिकेतून पाहायला मिळणार आहे.

पंजाबमध्ये या चित्रपटाचं शूटिंग झालं असून तिकडची कथा या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. नुकतंच चित्रपटाचं पहिलं पोस्टर आणि टीझर समोर आला आहे. यामधून ही प्रेमकथा असल्याचं समजतं. शर्वरी यामध्ये एका तरुण मुलीच्या भूमिकेत दिसत आहे. दोन वेण्या, पंजाबी ड्रेस असा तिचा लूक आहे. तर वेदांग टीझरमध्ये 'मैं वापस आउंगा' असं म्हणताना दिसत आहे. त्यामुळे आता या चित्रपटाबद्दल उत्सुक्ता निर्माण झाली आहे.

# IPL 2026 सुरू होण्यापूर्वीच वाद!

## सन टीव्हीने चेन्नई सुपर किंग्सला कोर्टात खेचत मागितले १ कोटी

महाईन्यूज । नवी दिल्ली

**इंडियन प्रिमीयर लीगचे नवा हंगाम सुरू होण्याच्या आधीच स्पर्धेतील दिग्गज संघ वादात सापडताना पाहायला मिळत आहेत. द हिंदूने दिलेल्या वृत्तानुसार, सन टीव्ही नेटवर्क लिमिटेडने चेन्नई सुपर किंग्स (CSK) विरुद्ध मद्रास उच्च न्यायालयात कॉपीराइट उल्लंघन केल्याप्रकरणी खटला दाखल केला आहे.**





चेन्नई सुपर किंग्सने त्यांच्या नवीन जर्सीच्या प्रमोशनसाठी सोशल मीडियावर रजनीकांत यांच्या जेलर, जेलर २ आणि कुली या चित्रपटांमधील ऑडिओ ट्रॅक्स, बॅकग्राउंड म्युझिक आणि डायलॉग्जचा वापर केला होता. यानंतर सन टीव्हीने शुक्रवारी हे कायदेशीर पाऊल उचलले आहे.

सन टीव्ही नेटवर्कचे वकील जे. रविंद्रन यांनी न्यायमूर्ती सेंथिलकुमार राममूथी यांना सांगितले की सीएसकेने एक मार्च रोजी मेल मिळाल्याच्या नंतर कॉपीराइट मटेरियल वापरणे बंद केले. या मेलमध्ये परवानगीशिवाय मटेरियल वापरल्याचे नमूद करण्यात आले होते, तसेच सीएसकेने ते भविष्यातदेखील वापरू नये असेही बजावण्यात आले होते.

सीएसकेची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील पी. एस. रमन यांनी न्यायमूर्तींना सांगितले की, त्यांच्या अशिलाने संबंधित मटेरियल वापर बंद केला आहे आणि जर त्यांना भविष्यात ते वापरायचे असेल तर त्यापूर्वी आवश्यक ती रीतसर परवानगी घेतली जाईल.

रिपोर्टनुसार, वर उल्लेख केलेले चित्रपट सन टीव्ही नेटवर्कने निर्मिती केलेले आहेत आणि चित्रपटांचे संगीतकार अनिरुद्ध रविचंदर यांनी यापूर्वीच एका डॉक्युमेंटवर स्वाक्षरी केली होती, ज्यानुसार संगीताच्या व्यावसायिक वापराचे सर्व हक्क त्यांनी संबंधित प्रोडक्शन फर्मला दिले आहेत. हे कागदपत्र देखील न्यायालयातही सादर करण्यात आले.

सीएसके लीमिटेडने त्यांच्या नवीन जर्सीच्या प्रमोशनसाठी विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये चित्रपटातील साउंड ट्रॅक आणि डायलॉग्जचा वापर केल्याचे पाहून त्यांना धक्का बसला, असे फिर्यादी सन टीव्हीने म्हटले आहे. न्यायालयात माहिती देण्यात आली की, ही संघाची एक जर्सी २३९९ रुपयांना विकली जात असून चित्रपटातील साउंड ट्रॅक आणि डायलॉग्ज यांचा आर्थिक लाभासाठी अनधिकृतपणे वापर करण्यात आला.

फिर्यादीने न्यायालयाकडे सीएसके लिमिटेडला या अनधिकृत वारासाठी ताकीद देण्याची विनंती केली आणि या अनधिकृत वापरातून किती पैसा कमावण्यात आला याची सविस्तर हिशोब सादर करण्याचे आदेश द्यावेत मागणी केली. तसेच सीएसकेने मिळालेली रक्कम हा खटला निकाली निघत नाही तोपर्यंत न्यायालयात जमा करण्याचीही मागणी यावेळी करण्यात आली. याबरोबरच सन टीव्ही नेटवर्कने या प्रकारामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून १ कोटी रुपयांची मागणी केली आहे.

## काव्या मारनच्या सनरायझर्सचं सोशल मीडिया अकाउंट सस्पेंड

महाईन्यूज । हैदराबाद

**आयपीएल २०२६ पूर्वी सनरायझर्स हैदराबाद संघाची मालकिण काव्या मारन वादात अडकली आहे. इंग्लंडच्या “द हंड्रेड” लीगमधील सनरायझर्स ग्रुप फ्रँचायझीने एका पाकिस्तानी खेळाडूला लिलावत संघात सामील केलं आहे, ज्यामुळे वाद निर्माण झाला. पहिल्यांदाच, “द हंड्रेड” मध्ये लिलाव पार पडला, जिथे सनरायझर्स लीड्सने पुरुषांच्या स्पर्धेसाठी पाकिस्तानी फिरकी गोलंदाज अबरार अहमदला मोठ्या रकमेला खरेदी केलं.**



### पाकिस्तानी खेळाडूला संघात घेतल्याने ट्रोल

लिलावापासून काव्या मारन आणि तिच्या फ्रँचायझीवर बरीच टीका झाली आहे. यादरम्यान, फ्रँचायझीचे सोशल मीडिया अकाउंट अचानक निलंबित करण्यात आले आहेत. लिलावात अबरारच्या खरेदीवरून वाद सुरू झाल्यानंतर काही तासांतच, सनरायझर्स लीड्सचे ‘एक्स’ अकाउंट निलंबित करण्यात आले. फ्रँचायझीच्या अकाउंटमध्ये असं म्हटलं आहे की ते एक्सच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल निलंबित करण्यात आलं आहे.

यानंतर काव्या मारन आणि सनरायझर्स फ्रँचायझीला मोठ्या ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. यादरम्यान आता संघाचं सोशल मीडिया अकाऊंट सस्पेंड केलं आहे.

सनरायझर्स फ्रँचायझीची मालकिण काव्या मारनला तीव्र टीकेला सामोरं जावं लागत आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर, सनरायझर्स लीड्सचे सोशल मीडिया अकाउंट अचानक निलंबित करण्यात आले आहेत, ज्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

द हंड्रेड पुरुष स्पर्धेसाठी पहिल्यांदाच खेळाडूंचा लिलाव गुरुवारी, १२ मार्च रोजी इंग्लंडमध्ये झाला. पाकिस्तानी लेग-स्पिनर अबरार अहमदला सनरायझर्स लीड्सने अंदाजे २.३ कोटी रूपये किंमत मोजत संघात सामील केलं. यावेळी काव्या मारन देखील तिच्या फ्रँचायझीसोबत लिलावाच्या टेबलावर बसली होती आणि संघाने हा निर्णय घेताच, सोशल मीडियावर एकच खळबळ उडाली.

लिलावापूर्वी सर्वांचे लक्ष स्पर्धेतील चार भारतीय मालकीचे संघ पाकिस्तानी खेळाडू खरेदी करतील का याकडे होते. हा प्रश्न एका रिपोर्ट्समुळे निर्माण झाला, कारण चार भारतीय मालकीच्या आयपीएल फ्रँचायझी पाकिस्तानी खेळाडू खरेदी करणार नाहीत असा दावा एका अहवालात करण्यात आला होता. यानंतर, ईसीबीने सर्व फ्रँचायझींशी सल्लामसलत करून एक निवेदन जारी केले की ते खेळाडूंना त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या आधारावर नव्हे तर त्यांच्या क्षमतेच्या आधारावर खरेदी करतील.

द हंड्रेड स्पर्धेच्या लिलावात १३ पाकिस्तानी खेळाडूंनी भाग घेतला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
दि. 14 मार्च 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# आळंदीतील प्रस्तावित प्रकल्पांना निधीची मागणी!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सरकारचे लक्ष वेधले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहर तसेच श्रीक्षेत्र आळंदीच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांना राज्य शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी या प्रकल्पांकडे शासनाचे लक्ष वेधत निधी मंजुरीसाठी पाठपुरावा केला आहे.**




महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये तालिका अध्यक्ष म्हणून योगेश सागर यांनी आमदार लांडगे यांच्या मागणी प्रतिसाद दिला. पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत विविध योजनांसाठी निधीची मागणी करण्यात आली आहे.

AMRUT-३ योजनेअंतर्गत शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पासाठी सुमारे २०१६ कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे. तसेच पवना थेट जलवाहिनी प्रकल्पासाठी १०१५ कोटी रुपये, आंद्रा प्रकल्पातून १०० एमएलडी पाणीपुरवठा योजनेसाठी २११ कोटी रुपये, तसेच २०० एमएलडी क्षमतेच्या वॉटर ट्रीटमेंट प्लांटसाठी ६० कोटी रुपये निधी देण्याचा प्रस्ताव आहे. भामा आसखेड प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उर्वरित निधी उपलब्ध करून देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय शहरातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी स्काडा (SCADA) वॉटर बल्क मॅनेजमेंट प्रकल्पासाठी ४६ कोटी रुपये निधी देण्याची मागणी करण्यात आली. भविष्यातील गरज लक्षात घेऊन चासकमान व मुळशी धरणातून पाणी आरक्षित करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याचीही मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी डुडूळगाव येथे इको टुरिझम पार्कसाठी २०० कोटी रुपये, आंतरराष्ट्रीय दर्जाचा सफारी पार्क, तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे गुलाबपुष्प उद्यान उभारण्यासाठी १०० कोटी रुपये निधीची मागणी करण्यात आली आहे. तसेच, नगरविकास विभागांतर्गत नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी आवश्यक भूसंपादन निधी उपलब्ध करून देण्याची तसेच संविधान भवन उभारणीच्या कामाला गती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

> “ पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि श्रीक्षेत्र आळंदीचे वाढते धार्मिक महत्त्व लक्षात घेता पाणीपुरवठा, पर्यावरण, पर्यटन आणि पायाभूत सुविधा मजबूत करणे अत्यंत गरजेचे आहे. शहराच्या तसेच तीर्थक्षेत्राच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन हे सर्व प्रकल्प शासनाकडे मांडले असून त्यासाठी आवश्यक निधी मंजूर व्हावा, यासाठी मी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सातत्याने पाठपुरावा करत आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून या विकासकामांना निश्चितच गती मिळेल, असा मला विश्वास आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### पर्यावरण, नदी संवर्धनावर “फोकस”

पर्यावरण विभागांतर्गत सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर प्रकल्पासाठी एकूण १८९८ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यात इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी ९६० कोटी रुपये आणि पवना नदी सुधार प्रकल्पासाठी ९५३ कोटी रुपये निधीची मागणी आहे. शहरातील जुन्या १४ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचे (STP) अपग्रेडेशन करण्यासाठी २५१ कोटी रुपये तसेच गार्डन विभागांतर्गत री-युज ऑफ वॉटर प्रकल्पासाठी २०० कोटी रुपये निधी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मोशी घनकचरा प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आणि औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर प्रकल्पासाठी ६६३ कोटी रुपये निधी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### श्री क्षेत्र आळंदीचा यात्राकर अनुदान वाढ करा..

दरम्यान, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यभूमी असलेल्या श्रीक्षेत्र आळंदीच्या शाश्वत विकासासाठीही आमदार लांडगे यांनी विविध मागण्या केल्या आहेत. आळंदी नगर परिषदेसाठी आधुनिक प्रशासकीय इमारतीसाठी २५ ते ३० कोटी रुपये, शहरातील पाणी शुद्धीकरण व ड्रेनेज प्रकल्पासाठी सुमारे ३५० कोटी रुपये, तसेच नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी ३५० कोटी रुपये निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. शहरातील पाणी वापर व्यवस्थापन सुधारण्यासाठी सर्व नळजोडण्यांवर वॉटर मीटर बसविण्यासाठी ६ कोटी रुपये निधी देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच तीर्थक्षेत्रातील सुरक्षा वाढविण्यासाठी CCTV प्रकल्पासाठी ५ कोटी रुपये आणि LED स्ट्रीट लाईट व भूमिगत विद्युत वाहिनी प्रकल्पासाठी १० कोटी रुपये निधी देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय आळंदी नगरपरिषदेला मिळणाऱ्या यात्राकर अनुदानात वाढ करून आर्थिक ताण कमी करावा.



# शिवछत्रपती लिनिअर गार्डनच्या सुशोभीकरणासाठी पुढाकार!

## महापालिका अधिकाऱ्यांना निर्देश : भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पिंपळे सौदागर प्रभाग क्रमांक २८ मधील शिवछत्रपती लिनिअर अर्बन गार्डनची भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी आज उद्यान विभाग व स्थापत्य उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान गार्डनमधील स्वच्छता, सुशोभीकरण आणि हिरवाई वाढविण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.**





काटे यांनी गार्डनमधील हॉर्टिकल्चर लॉनचे योग्य व्यवस्थापन करण्यावर भर देत अतिरिक्त वाढलेल्या झाडांची छाटणी करण्याचे निर्देश दिले. तसेच झाडांच्या पानगळतीमुळे गार्डनमध्ये साचलेला कचरा व राडारोडा तातडीने उचलण्यास सांगितले. परिसर अधिक आकर्षक आणि देखणा करण्यासाठी नवीन लॉन लावणे, विविध रंगांची फुलझाडे लावणे तसेच मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

लावलेल्या झाडांना नियमित पाणी देऊन ती हिरवीगार व तंदुरुस्त ठेवण्यावर विशेष भर देत काटे यांनी नागरिकांना स्वच्छ, सुंदर आणि हिरवाईने नटलेले वातावरण मिळावे यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, “शिवछत्रपती लिनिअर गार्डन हे पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचे विरंगुळ्याचे ठिकाण आहे. त्यामुळे या उद्यानात स्वच्छता, सुशोभीकरण आणि हिरवाई राखणे अत्यंत आवश्यक आहे. गार्डन अधिक सुंदर व आकर्षक बनविण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांना स्वच्छ व हिरवेगार वातावरण उपलब्ध करून देणे हे आमचे प्राधान्य आहे.” या पाहणीवेळी नगरसेविका सौ. अनिताताई काटे व नगरसेविका सौ. कुंदाताई भिसे यांनीही उपस्थित राहून उद्यानाच्या देखभाल व सुशोभीकरणाबाबत उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

> पिंपळे सौदागर परिसरातील शिवछत्रपती लिनिअर गार्डन हे नागरिकांसाठी महत्त्वाचे विरंगुळ्याचे ठिकाण आहे. या उद्यानात स्वच्छता, सुरक्षितता आणि हिरवाई कायम राखण्यासाठी महापालिकेच्या संबंधित विभागांमार्फत आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने करण्यात येतील. गार्डन अधिक सुंदर, स्वच्छ आणि आकर्षक बनवून नागरिकांना उत्तम वातावरण मिळावे, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.
>
> – **शत्रुघ्न (बापू) काटे,** शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

# भावनिक संतुलनामुळे तणावमुक्त व यशस्वी जीवन शक्य

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे प्रायोजित व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, आकुर्डी आयोजित “भावनिक बुद्धिमत्ता” या विषयावर आधारित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. आजच्या स्पर्धात्मक व तणावपूर्ण जीवनात भावनिक संतुलन राखणे, सकारात्मक विचारसरणी विकसित करणे आणि संघभावनेने काम करणे याचे महत्त्व या परिषदेच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.**



या परिषदेच्या उद्घाटन समारंभासाठी नांदेड येथील वरिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ व मानसोपचार सल्लागार, डॉ. नंदू मुलमुले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी बोलताना त्यांनी दैनंदिन जीवनात भावनांवर नियंत्रण ठेवणे व तर्कशुद्ध पद्धतीने वागणे किती महत्त्वाचे आहे यावर भर दिला. मजबूत भावनिक बुद्धिमत्ता टिकवून ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी विचारप्रक्रिया आणि परस्परसंवाद यांची जागा घेणारे साधन नसून, सहाय्यक साधन म्हणून वापरली जावी. एखाद्या परिस्थितीत तात्काळ प्रतिक्रिया देण्याऐवजी थोडा वेळ थांबून विचारपूर्वक प्रतिसाद देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मंचावर संस्थेचे संकुल संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम (नि), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे, मुख्य वित्तीय अधिकारी श्री बिपिन शर्मा आणि डॉ. शिल्पा चौधरी उपस्थित होत्या. परिषदेच्या यशस्वी नियोजनासाठी प्रा. डॉ. सारिका निकम आणि प्रा. डॉ. प्रियतमा पोवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भावनिक बुद्धिमत्तेचे महत्त्व, ताणतणाव व्यवस्थापन, आत्मजाणीव, आत्मनियंत्रण, सहानुभूती आणि प्रभावी संवादकौशल्य याबाबत मार्गदर्शन मिळाले. वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यात योग्य निर्णय घेण्यासाठी आणि सकारात्मक नातेसंबंध निर्माण करण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता कशी उपयुक्त ठरते यावरही डॉ. मुलमुले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. देशभरातील विविध महाविद्यालयांतील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिषदेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.


CONSCIOUS
LEARNING
PRIYADARSHANI
GROUP OF SCHOOLS
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42
YEARS OF ENRICHING
EXPERIENCE IN
EDUCATION
50
FIFTY PLUS NATIONAL &
INTERNATIONAL AWARDS
ACROSS SCHOOL
9823231705
8459167326


CONSCIOUS
LEARNING
PRIYADARSHANI
GROUP OF SCHOOLS
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42
YEARS OF ENRICHING
EXPERIENCE IN
EDUCATION
50
FIFTY PLUS NATIONAL &
INTERNATIONAL AWARDS
ACROSS SCHOOL
9823231705
8459167326

Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation Batch
2025-26

ADMISSION OPEN

From 23rd March 2026
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
students of other schools

'C' Language: 1300/-
Corel Draw :Fees: 1300/-
'C++' Language: 1300/-
Adobe Photoshop: 1300/-
Basic Java: 1300/-
Basic Tally: 1500
Scratch Animation: 1300/-
Animation with PowerPoint: 1300/-
Basic Hardware: 1300/-
Online Designing: 1300

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool